# बायबलमधील संदेष्टे

फा. रॉबर्ट बी. डिसोजा

**अ) प्रस्तावना :**

बायबलच्या जुन्या कराराचे एकूण तीन भाग आहेत. नियमशास्त्र, संदेष्ट्यांचे ग्रंथ आणि इतर साहित्य. त्यापैकी नियमशास्त्रामध्ये पहिल्या पाच पुस्तकांचा समावेश होतो. संदेष्ट्यांच्या ग्रंथामध्ये एकूण १५ संदेष्ट्यांचा तर इतर साहित्यामध्ये इतिहास, कथा व काव्ये आणि ज्ञानसाहित्य अशा २६ पुस्तकांचा समावेश होतो. आजच्या अधिवेशनामध्ये आपण १५ संदेष्ट्यांची ओळख करून घेणार आहोत.

**ब) संदेष्टा म्हणजे कोण?**

देवाच्या नावाने बोलणारा, वर्तमानकाळावर चिंतन करून भविष्यकाळाविषयी सावधानतेचा इशारा देणारा, ईश्वरविरूद्ध वर्तनावर कडक टीका करणारा, विकृत वृत्तींना सरळ सरळ आव्हान देणारा देवाचा माणूस म्हणजे संदेष्टा होय.

**क) संदेष्ट्याची सात वैशिष्ट्ये कोणती?**

बायबलमध्ये खरे संदेष्टे व खोटे संदेष्टे ह्यांच्यामध्ये स्पष्टपणे फरक करून दाखविण्यात आलेला आहे. खऱ्या संदेष्ट्यांची एकूण ७ वैशिष्ट्ये आहेत.

१) ईश्वरी पाचारण (Divine call)

२) अस्वस्थ करणारी उर्मी (Compulsion)

३) देवाच्या नावाने संदेश (In the name of God)

४) कल्पक चित्तवृत्ती (Creativity)

५) संदेशाला चमत्कारांची साथ (Miracle)

६) राजकीय शक्तीला सह देण्याचे धैर्य (Political conformation)

७) दुःखसहन करण्याची तयारी (Readiness to suffer)

**ड) संदेष्ट्यांचे कार्य :**

इसवी सन पूर्व ७६० ते इसवी सन पूर्व ३५० हा संदेष्ट्यांचा काळ मानला जातो. शलमोन राजांच्या मृत्यूनंतर इस्राएली राज्याचे इस्राएल व यहुदा असे दोन तुकडे झाले. तेथल्या राजांनी इस्राएली व यहुदी लोकांना दुसऱ्या देवाकडे वळविले त्यामुळे सर्वत्र गोंधळ माजला. जेरुसलेम मंदिराबरोबर इतर देवदेवतांची पूजास्थाने बांधली गेली. लोक मूर्तीपूजक बनले. देशात दुष्काळ पडला. इसवी सन पूर्व ७२१ साली इस्राएलची राजधानी शोमरोनवर हल्ला करून असिरियाने तिचा पाडाव केला. लोकांना धरून निनवेला नेण्यात आले. इसवी सन पूर्व ५९७ साली बाबिलोनने यहुदाची राजधानी जेरुसलेम येथील मंदिर पाडले व लोकांना बाबिलोनच्या हद्दपारीत नेण्यात आले. तेथून परतल्यानंतर लोकांनी मंदिर पुन्हा उभारले.

ह्या सर्व गदारोळात संदेष्ट्यांनी लोकांना प्रसंगी कडक इशारा तर कधी दिलासा देणारा देवाचा शद्ब ऐकविला आणि त्यांना मार्गदर्शन केले हे करीत असताना त्यांना लोकांकडून व राज्यकर्त्यांकडून अमानुष छळ सहन करावा

लागला. मात्र त्यांच्या शद्बांमुळे इस्राएलचे राष्ट्र व यहुदी धर्म टिकून राहिला.

**इ) संदेष्ट्यांची वर्गवारी**

संदेष्ट्यांची वर्गवारी एकूण दोन प्रकारात केली जाते.

१) **लहान संदेष्टे व मोठे संदेष्टे** : संदेष्ट्यांचा कार्यकाळ, त्यांच्या संदेशाची भौगोलिक व्याप्ती आणि त्यांच्या नावाने लिहिण्यात आलेल्या पुस्तकांचा आकार यावरून १५ संदेष्ट्यांपैकी ३ संदेष्टे (यशाया, यिर्मया व यहेज्केल) मोठे संदेष्टे मानले जातात आणि उरलेले १२ संदेष्टे (आमोस, होशेय, मीखा, सफन्या, नहूम, हबक्कूक, ओबद्या, जखऱ्या, मलाखी, योना, योहल आणि हाग्गय) हे लहान संदेष्टे मानले जातात.

२) **हद्दपारकेंद्रित विभागणी :** वरील १५ संदेष्ट्यांपैकी आमोस, होशेय, मीखा, सफन्या नहूम, हबक्कूक व योना हे हद्दपूर्व (Pre - Exile) संदेष्टे मानले जातात. त्यांनी लोकांना त्यांची चूक दाखवली आणि त्यांना सावधानतेचा इशारा दिला. यिर्मया व यहेज्केल हे हद्दपार कालीन संदेष्टे होत. त्यांनी लोकांना हद्दपारीच्या काळात आशेचा संदेश देऊन त्यांना आधार दिला. ओबद्या, हाग्गय, जखऱ्या, मलाखी व योएल हे हद्दपारीनंतरचे संदेष्टे होत. त्यांनी लोकांना मंदिर उभारणी, उपासनेचे पालन, धार्मिकता याविषयी मार्गदर्शन केले.

**फ) संदेष्ट्यांचा संदेश :**

आमोसने लोकांना सामाजिक न्यायाची शिकवण दिली. होशेयने त्यांना देवाचे निस्सीम प्रेम समजावून सांगितले. मीखा व यशाया ह्यांनी घाबरलेल्या लोकांना आशा व आत्मविश्वास दिला. यिर्मयाने आपला संदेश देताना खूप यातना सहन केल्या. सफन्याने परमेश्वराच्या क्रोधाची लोकांना जाणीव करून दिला. योनाने पश्चात्तापाचा मंत्र दिला. नहूमने निनवेच्या पाडावानंतर हर्ष व्यक्त केला. हबक्कूकने देवावरील विश्वास प्रकट करण्यास लोकांना प्रेरणा दिली. यहेज्केलने लोकांचे सांत्वन केले. ओबद्याने विकृत वृत्तीचा धिक्कार केला. जखऱ्या व हाग्गय ह्यांना मंदिर उभारणीत लोकांना मार्गदर्शन केले मलाखीने उपासना तर योएलने धार्मिकता जोपासण्यास लोकांना उत्तेजन दिले.

**प्रश्न** :

१) जुन्या कराराचे एकूण किती भाग आहेत?

२) बायबलमध्ये एकूण किती संदेष्टे आहेत?

३) बायबलमधील मोठे संदेष्टे कोणते?

४) संदेष्टा ह्या शब्दाचा अर्थ सांगा?

५) संदेष्ट्यांनी कोणत्या काळात कार्य केले.

६) पुढीलपैकी कोणत्याही एका संदेष्ट्यांचे पुस्तक वाचा आणि त्याच्याविषयी १० ओळी लिहा.

अ) योना, ब) मीखा क) मलाखी ड) नहूम इ) योएल फ) हबक्कूक

ग) हाग्गय.

७) आजच्या जगात तुम्ही संदेष्टे कसे बनू शकता? त्यात कोणत्या अडचणी आहेत? त्यावर कशी मात करता येईल?

***

# येशू - एकमेव तारणारा

**– फा. रॉबर्ट बी. डिसोजा**

**अ) प्रस्तावना :**

शुक्र. दि. ११ ते सोम. दि. १४ एप्रिल २००८ दरम्यान वसई बिशप्स हाऊसमध्ये पहिली धर्मप्रांतीय मिशन परिषद बोलावण्यात आलेली होती. ह्या मिशन परिषदेमध्ये धर्मगुरु, सिस्टर्स, ब्रदर्स आणि प्रापंचिक मिळून २५५ प्रतिनिधी हजर होते. सांगण्या कथा प्रभूरायाचा हा विषय केंद्रस्थानी ठेवून एकूण ११ अधिवेशने ह्या मिशन परिषदेमध्ये घेण्यात आली. दि. १२ एप्रिल रोजी बायबल अभ्यासक रे. डॉ. फ्रान्सिस परेरा, ये.स. ह्यांनी 'येशू एकमेव तारणारा' ह्या विषयावर अतिशय सुंदर मार्गदर्शन केले.

**ब) येशू एकमेव तारणारा : प्रत्यक्षानुभव**

माणूस अपूर्ण आहे. अपुर्णतेकडून तो अपुर्णतेकडेच वाटचाल करतो. आयुष्यभर कष्ट करुन जेव्हा चार घास सुखाचे घ्यायचे तेव्हाच त्याला एखादा आजार, एखादी विकृती किंवा एखादे अपयश अथवा अपघात, नैसर्गिक आपत्ती ह्यांना सामोरे जावे लागते. जे केले पाहिजे ते त्याच्याने होत नाही. जे टाळले पाहिजे तेच नेमके तो करतो सर्वसुखे समोर हात जोडून उभी असूनही त्याच्या जिवाला सुख व मनाला शांती मिळत नाही. केवळ ह्या भूतलावरच नव्हे तर त्याहीनंतर आपले काय होणार आहे ह्याची त्याला शाश्वती नसते तो सदैव बेचैन असतो.

कविवर्य नारायण वामन टिळक, पंडिता रमाबाई सरस्वती, साधू सुंदरसिंग, बेगम बिल्क्वीस शेख अशा सर्वांनी आयुष्याच्या पहिल्या भागात खऱ्या देवाचा शोध घेण्याचा खूप प्रयत्न केला परंतु मनातली पोकळी भरुन काढणारी मनःशांती त्यांना काही मिळाली नाही. येशू भेटल्यानंतर मात्र त्यांचे जीवन बदलून गेले. 'तुज सोडूनी ख्रिस्ता, जाऊ कुठे मी' आणि 'पुष्कळ अजुनी उणा' अशी गाणी नारायण वामन टिळकांनी लिहिली. पंडिता रमाबाईंना बायबलचे पहिले मराठी भाषांतर केले. साधू सुंदरसिंगांनी तिबेट, चीन, इंडोचायना अशा दुर्गम भागात येशूची कथा सांगितली. बेगम बिल्क्वीस शेख ह्यांनी येशूची सुवार्ता पसरविण्यासाठी पाकिस्तान सोडले आणि त्या अमेरिकेत स्थायिक झाल्या.

**क) येशू : एकमेव तारणारा - एक स्पष्टीकरण**

फा. डॉ. फ्रान्सिस परेरा, ये.स. ह्यांनी येशू हा एकमेव तारणारा आहे हे सत्य स्पष्ट करुन सांगताना मांडलेल्या मुद्यांपैकी ५ मुद्दे आपण अभ्यासू या.

१) **येशूचे नाव** : येशूच्या नावाचा (येशुआ) हिब्रू भाषेतील अर्थ आहे 'तारण' किंवा 'देव तारण करतो,' मत्तय १:२१ मध्ये गाब्रिएल देवदूत संत योसेफला सांगतो, ''तू त्याचे नाव येशू असे ठेव कारण तो आपल्या लोकांना त्यांच्या पापांपासून तारील.''

२) **येशू प्रभू आहे** : प्रभू ह्या शद्बासाठी इंग्रजीत LORD, ग्रीकमध्ये किरियॉस आणि हिब्रूमध्ये याव्हे हे शद्ब वापरले जातात. जुन्या करारातील याव्हे हाच नव्या करारातील येशू होय.

३) **येशूची साक्ष** : येशूने म्हटले, मार्ग, सत्य व जीवन मीच आहे. माझ्याकडे आल्यावाचून पित्याकडे कोणी येत नाही (योहान १४:६). तसेच पिता आणि मी एक आहोत. ज्याने मला पाहिले आहे त्याने पित्याला पाहिलेले

आहे.

**४) येशूचे जीवन मरण व पुनरुत्थान** : येशूचा जन्म पवित्र आत्म्याच्या योगे झाला. आयुष्यभर त्याने असंख्य चमत्कार केले. मानवाच्या पायमुक्तीसाठी त्याने क्रुसावरील मरण पत्करले, त्याच्या पुनरुत्थानाने तो आजही पापी जनांची मुक्ती करणारी कृपा देत असतो.

**५) प्रेषितांची व पौलची साक्ष** : पेन्टेकॉस्टनंतर येशूचे शिष्य सर्वत्र त्याची सुवार्ता सांगत फिरु लागले. निरक्षर व अडाणी असूनही त्यांनी त्या काळच्या यहुदी धर्माधिकाऱ्यांसमोर येशूची साक्ष दिली की, ''तारण येशू ख्रिस्ताशिवाय दुसऱ्या कोणाकडूनही नाही. कारण ज्यामुळे आपले तारण होईल असे दुसरे कोणतेही नाव आकाशाखाली मनुष्यांमध्ये दिलेले नाही'' (प्रेषितांची कृत्ये ४:१२). संत पौलने तर येशूचा प्रभू व तारणारा म्हणून स्वीकार केल्यानंतर पुढील शद्ब उच्चारले, ''यापुढे मी जगतो असे नाही तर ख्रिस्त माझ्याठायी जगत आहे'' (गलतीकरांस पत्र २:२०).

**ड) येशू : एकमेव तारणारा-एक प्रतिसाद**

वरील विवेचनानवरुन तीन टप्प्यांत आपण ह्या सत्याला प्रतिसाद देऊ शकतो.

**१) येशूच्या प्रेमाचा व्यक्तिशः अनुभव घेणे** : येशू हा एकमेव तारणारा आहे ही भूमिका घेऊन ख्रिस्तसभा विविध धार्मिक विधी, संस्कार व उपासना साजरी करते त्याद्वारे ख्रिस्ती माणसाने येशूच्या त्यागाचा व प्रेमाचा व्यक्तिशः अनुभव घ्यावा अशी अपेक्षा असते.

**२) ख्रिस्तानुभवाला सुसंगत अशी जीवनपद्धती अंगीकारणे** : एकदा का आपण येशूला स्वत:चा वैयक्तिक प्रभू व तारणारा म्हणून स्वीकारले की त्यानुसार आपल्या ख्रिस्ती समूहात आपले जीवन व आचरण असायला हवे. भ्रष्टाचार, अतिमद्यपान, कोर्टकचेऱ्याऐवजी शुद्धता, प्रेम, शांती, निखळ आनंद ही पवित्र आत्म्याची फळे आपण धारण करायला हवीत.

**३) ख्रिस्ताची सुवार्ता पसरविण्याची मनोवृत्ती बाळगणे :** येशूचे नाव किंवा येशूची कथा आतापर्यंत ज्यांनी ऐकलेली नाही त्यांना ती सांगणे हे आपले कर्तव्य आहे. ४५० वर्षांपुर्वी परदेशी मिशनरी आपल्याकडे आले म्हणून आज आपण येशूचे अनुयायी आहोत. अजूनही बऱ्याच ठिकाणी येशू कथा सांगण्यास अनुकूल परिस्थिती असूनही तिथे ख्रिस्ती माणूस पोहाचलेला नाही. स्वीकारणार आहोत आपण हे आव्हान!

***